22-23


Impact Factor-8575 (SJIF) ISSN-2278-9308


# B.Aadhar

## Peer-Reviewed & Refreed Indexed

### Multidisciplinary International Research Journal

**October-2022**





**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Editor:**
Dr.Dinesh W.Nichit
Principal
Sant Gadge Maharaj
Art's Comm,Sci Collage,
Walgaon.Dist. Amravati.

**Executive Editor:**
Dr.Sanjay J. Kothari
Head, Deptt. of Economics,
G.S.Tompe Arts Comm,Sci Collage
Chandur Bazar Dist. Amravati

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

| | | |
|---|---|---|
| 20 | Role of Women in Conservation of Environment **Dr.Vaishali R. More** | 75 |
| 21 | Women Empowerment in India **Dr. Meenal N. Gawande** | 78 |
| 22 | The Effect of Deproteinised Juice (DPJ) on Seedling Growth of Different Plants (by Foliar Spray Method) **V. G. Manwatkar** | 81 |
| 23 | Clashes between India & China over the years and role of Quad members in recent time. **Vinay kumar** | 86 |
| 24 | Impact of Covid-19 Pandemic on Primary Education in India **Dr. Manisha Vinay Aole** | 92 |
| 25 | Satisfaction of Customers Visiting General and Super Shops of Buldana District for Buying Grocery – A Comparative Study **Sumit Rajendra Ginode , Prof. Dr. Anil S. Purohit** | 96 |
| 26 | The Ideological Impact Of Shree Narayana Guru On The Billavas Of Colonial South Kanara **Dr. Meera Devi.B** | 101 |
| 27 | Farmers Insights Regarding Agricultural Creditin Dreadful Rural Maharashtra **Bhaskar Yadav , Dr. H.G. Vidhate** | 108 |
| 28 | Role of Communication in Business Development **Dr. Rajesh M. Deshmukh** | 113 |
| 29 | छत्रपती शाहू महाराज यांचे सामाजिक व सांस्कृतिक कार्य प्रविण राजकुमार भगत | 118 |
| 30 | सामाजिक मूल्ये (Social Values) : एक अन्वयार्थ प्रा.डॉ.प्रियदर्शन भवरे | 123 |
| 31 | महाराष्ट्र राज्यातील रेल्वे मार्गाच्या निरपेक्ष घनतेचे भौगोलिक अध्ययन डॉ. राजेश पांडुरंग मेश्राम | 130 |
| 32 | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव आणि भारतीय राज्यघटना – डॉ. राम ताटे डॉ. अर्चना वाघमारे | 135 |
| 33 | मराठीचे अध्ययन आणि अध्यापन प्रा. डॉ. गणेश न. चव्हाण | 138 |
| 34 | अनुसूचित जाती-जमाती : एक दृष्टीक्षेप प्रा. युवराज खोडस्कर | 141 |
| 35 | डॉ. युवराज सोनटक्के यांच्या 'स्त्री' कवितेचा जनसाहित्याच्या जननिष्ठ दृष्टीतून परीक्षण डॉ. दिनेश की. राऊत | 144 |
| 36 | Riyaz Khair Aabadi Ek Munfarid Shayer Dr Feroz S Khan | 148 |

# डॉ. युवराज सोनटक्के यांच्या 'स्त्री' कवितेचा जनसाहित्याच्या जननिष्ठ दृष्टीतून परीक्षण

डॉ. दिनेश की. राऊत
युवाशक्ती कला आणि विज्ञान महाविद्यालय,
अमरावती
मो. नं. ९७६४६८८१५८/८९९९८९४२१४

"जननिष्ठ समीक्षापद्धती"

ललित साहित्यकृती ही आपल्याला संहितारूपात उपलब्ध असते. ही संहिता म्हणजे भाषिक चिन्हांच्या संयोगातून घडविलेली, वरकरणी जडवत् वाटणारी पण आंतरिक चैतन्याच्या संभाव्यतांनी भरलेली स्मरणोज्जीवित अनुभवांची संघटना असते. सुप्रसिद्ध साहित्यसौंदर्य विचारक बा. सी. मर्ढेकरांनी कलावस्तूतील 'सौंदर्य' या अमूर्त मूल्यसंकल्पनेच्या शोधात वस्तुनिष्ठता आणण्यासाठी 'लयतत्त्व' हे वस्तुनिष्ठ लक्षण पुढे आणले. हे लक्षण संवेदनाधिष्ठित कलांच्या बाबतीत 'संवेदनांच्या' रचनेचे तत्त्व म्हणून प्रस्तुत ठरत असले तरी साहित्यकला ही प्रत्यक्ष संवेदनांवर अधिष्ठित कला नसल्यामुळे तिला ते प्रस्तुत ठरणारच नव्हतेय म्हणून त्यांनी 'भावनाघटकांच्या' रचनेचे तत्त्व या अर्थाने लयतत्त्वाचा पुरस्कार केला. परन्तु भावनाघटकांच्या लयपूर्णतेची प्रतीती घेणे बहुसंख्य वाचकांच्या बाबतीत अशक्यप्राय म्हणून मर्ढेकरांना सौंदर्यभावना ही जीवशास्त्रीय भावना नसल्याचे विधान करून सौंदर्यबोधाला पात्र असलेला अर्थात् सौंदर्यभावना लाभलेला निवडक भाग्यवंतांचा एक गट मानावा लागला. त्यामुळे सौंदर्यानुभव ही निवडक भाग्यवंतांची मिरास होऊन बसलीय आणि 'सौंदर्य लयपूर्णता' हे समीकरण मानण्यामुळे मर्ढेकरी सौंदर्यविचाराला एकतत्त्वीकरणाचा दोष पत्करावा लागला.

ललित साहित्य हे विचार — भावना — इच्छा आकांक्षा — आदर्श जीवनमूल्ये आदि — कोटींचा सर्जनशील मेळ असतो. तरीही त्यातून सारे अप्रस्तुत पदर वेगळे करून नेमक्या इच्छित अशा मूर्त कोटींचा शोध घेणे शक्य होते मात्र ललित साहित्यातून एखाद्या अमूर्त कोटीचा वस्तुनिष्ठ शोध घेणे जिकिरीचे असते. याचे कारण अमूर्त कोटीतील संकल्पनांचे आकलन हा ज्ञात्याच्या अनुभवाचा विषय असतो आणि शोधकर्त्याच्या प्रकृतिविशेषांनुसार तसेच काळपरिसर– विशेषांनुसार अमूर्त संकल्पना वेगवेगळी रूपे धारण करू शकतात. उदाहरणार्थ, साहित्यकृतींच्या एखाद्या विशिष्ट संचामधील कलात्मकतेचा किंवा मानुषतामूल्याचा शोध घेणे.

(अ) जाणीवगर्भ अनुभव हे ललित साहित्याचे माध्यम आहे.

१) लेखकाच्या अंगाने पाहाता अनुभवघटकांची जाणीवलक्ष्यी नवरचना हे साहित्यकृतीचे स्वरूप

२) वाचकाकडून पाहाता स्मरणोज्जीवित अनुभवघटकांची पुर्नरचना हे वाचकांच्या जाणीवगर्भ अनुभवाचे स्वरूप असते. साहित्यकृतीत जाणिवांबरोबरच नेणिवेचेही कार्य महत्त्वाचे असते. त्यामुळे साहित्यकृतीत समाविष्ट असलेल्या कोटी या केवळ वस्तुनिष्ठ नसून मानसिकधरामानसिकही असतात. साहजिकच अभ्यासकाच्या मनाचे घटकही त्यांच्या आकलनात अभावितपणे समाविष्ट होत असतात. म्हणून केवळ पाश्चात्यांची आधुनिक वैज्ञानिक शोधपद्धती अशा कोटींच्या संशोधनात फलदायी ठरत नाहीतय तर त्यासोबतच पौर्वात्य पद्धतीचे निरामय व सखोल चिंतन देखील अशा संशोधनात आवश्यक ठरतेय जेणेकरून वस्तुनिष्ठ फलनिष्पत्ती होऊ शकेल.

(ब) निर्मात्याच्या जाणिवेची अभिव्यक्ती ही त्याने जाणीव–नेणिवेच्या संयोगातून उभारलेल्या अनुभवसंघटन–निर्मितीद्वारे होत असते. म्हणून लेखकाने निर्मिलेल्या अनुभवाची संघटना हे साहित्यकृतीचे स्वरूप असून वाचकाच्या जाणिवेतील परिवर्तन हे त्या अभिव्यक्तीमागील प्रयोजन असते. हे प्रयोजन त्या संघटनेत असलेल्या सूचनांनुसार जागे झालेल्या स्मृतिरूप अनुभवांच्या एकात्म परिणामाद्वारा सिद्धीस जात असते. निर्मिती, अस्तित्व (स्वरूप) आणि आस्वाद या तिन्ही विधांमधील अनुभवामागे अखंड असे एकचएक जाणीवसूत्र असल्यामुळे या तीन अवस्थांमध्ये

स्वतंत्रपणे जाणिवेचा वेध घेता आल्यास त्या जाणिवेतील अभ्यासकाचा व्यक्तिनिष्ठ अंश निरस्त होऊन जाणिवेच्या घटकांचा अभ्यास वस्तुनिष्ठ स्वरूपात शक्य होईल. पौर्वात्य पद्धतीच्या निरागय व सखोल चिंतनाची जोडही त्या अभ्यासाला द्यावी लागेल.

'जनसाहित्या'चे लक्षणविधान म्हणून खालील गृहीतक स्वीकारण्यात आले –

(i) जनसाहित्य हे सर्वजनांसाठी निर्माण होते.

(ii) जनसाहित्य हे सर्व वर्गगटांतील वाचकांना आपले वाटतेय मौल्यवानही वाटते.

(iii) जनसाहित्य हे व्यक्ती–समूह – समाजगट यांच्या हितापुरते सीमित नसतेय तर ते सर्वजनहितैषी असते.

जननिष्ठ साहित्य समिक्षेतील संज्ञा संकल्पनांची निर्मिती खालीलप्रमाणे –

•जनसाहित्य म्हणजे जनांचे जननिष्ठ साहित्य माणसातली माणुसकी जागवणारे साहित्य.

•जन म्हणजे माणसामाणसांत भेदभाव न मानणारे स्त्रीपुरुष - उपाधि भेदापलीकडला 'माणूस'.

•जननिष्ठा म्हणजे माणुसकीवरील अभंग निष्ठा - जनांप्रति समर्पितता.

•जननिष्ठ जाणीव म्हणजे समकालीन वास्तवाचा अर्थ

•जनसंस्कृति– संदर्भात शोधणारी जाणीव.

"कलात्मकता" किंवा कलात्मकतेशी निगडित "सौंदर्यात्मकता" ही संस्कृतिसापेक्ष अमूर्त कोटीची संकल्पना असून, जो अनुभव वाचकमनात संक्रमित करावयाचा तो समर्थपणे संप्रेषित करण्याची साहित्यकृतीची किमया हे "कलात्मकते"चे स्वरूप होय. ही किमया निर्मात्याच्या जाणीव–नेणिवेच्या फलदायी संयोगातून आलेल्या रचनासिद्धी, भाषासिद्धी – संवादसिद्धी अशा अनेक सुप्त प्रकट सिद्धींच्या योगाने निर्माण होतेय साहित्यसंहितेत (स्वरूपात) अवतरतेय आणि तीच साहित्यकृतीचे आशयिक ऊर्जाकेन्द्र आणि तिची विविध विस्तारअंगे यांच्यामध्ये मनोरम मेळ घडवून आणते. आस्वादसमयी कलाकृतिगत अनुभवाची आस्थापूर्ण पुनर्रचना करताना आस्वादक हा मेळ अनुभवतो. हाच त्याचा सौंदर्यानुभव होय.

जननिष्ठ जाणिवेतून शब्दबद्ध झालेली व वाचकाच्या मनात जननिष्ठा प्रवर्तित करणाऱ्या जीवनतथ्यांची मनोरम बांधणी म्हणजे जनसाहित्यकृती होय. ही बांधणी जितक्या प्रमाणात समृद्धसंपन्न असेल तितकी ती जनसंस्कृतीच्या जडणघडणीस पोषक ठरेल. (आणि त्याच प्रमाणात ती श्रेष्ठ साहित्यकृती ठरेल.)

(४) जनसाहित्य संशोधन : विश्लेषण पद्धती--

एकाचवेळी जीवनमूल्य व साहित्यमूल्य असलेला 'जननिष्ठा' हा जनसाहित्याचा कळीचा मूल्यनिकष होय. ह्या मूल्यनिकषाच्या आधारे (एक) निर्मात्याच्या जाणिवेचे मूल्यनिर्धारण, (दोन) साहित्यकृतीच्या संघटनेचे मूल्यनिर्धारण आणि (तीन) वाचकाच्या जाणीवजागृतीचे मूल्यनिर्धारण करण्यात येते आणि (चार) जनसाहित्यकृतीची प्रत ठरवण्यासाठी जाणीवप्रवर्तकतेची जननिष्ठता सर्वात शेवटी जोखण्यात येते. त्यासाठी खालील पायऱ्यांनी जावे लागते.

(१) निर्मात्याच्या जाणिवेची 'जननिष्ठे' च्या अनुरोधाने तपासणी

(अ) त्याच्या निर्मितीचे आवाहनलक्ष्य.

(ब) त्याच्या निर्मितीचे प्रयोजन आणि

(क) जाणीव, नेणीव

(ड) त्याच्या आत्मनिष्ठेचा आवाका

-- या तपासणीवरील तीन घटकांचा सूक्ष्म विचार साहित्यसंहितेच्या अंतर्गत घटकांच्या आधारे करण्यात येतोय व त्यावरून लेखकाच्या जाणिवेतील 'जननिष्ठे' चा शोध घेण्यात येतो.

(२) साहित्यकृतीच्या संघटनेची 'जननिष्ठे' च्या अनुरोधाने तपासणी

(अ) साहित्यकृतीचे आशयिक ऊर्जा–केन्द्र

(ब) साहित्यकृतीच्या आशयऊर्जा केन्द्राभोवतीचा अनुभवघटकांचा विस्तार–विकास व कौशल्यपूर्ण बांधणी

(क) साहित्यकृतीच्या रचनेतील अंग–अंगी मेळ : संप्रेषणसिद्धी.

या तपासणीवरील तीन घटकांचा सूक्ष्म विचार साहित्यसंहितेच्या अंतर्गत घटकांच्या आधारे करण्यात येतोय व त्यावरून साहित्यकृतीच्या संप्रेषणसिद्धीतील जननिष्ठेचा शोध घेण्यात येतो.

(३) वाचकाच्या जाणीवजागृतीची जननिष्ठेच्या संदर्भात तपासणी

(अ) वाचकाच्या प्रतीतीची व्यापकता

(ब) वाचकाच्या प्रतीतीची सखोलता आणि

(क) वाचकाच्या प्रतीतीची प्रगाढता & समृद्धता

या तपासणीवरील तीन घटकांचा सूक्ष्म विचार साहित्यसंहितेच्या तटस्थ मोकळ्या पूर्वग्रहरहित प्रतीतीच्या आधारे करण्यात येतोय व त्यावरून वाचकाच्या जाणीवजागृतीच्या जननिष्ठ प्रकृतीचा वेध घेण्यात येतो.

(४)प्रतीतीमागील प्रवर्तकतेची 'जनिनिष्ठे' च्या अनुरोधाने तपासणी अशी करताना अभ्यासकाला सहानुभवाचा आधार घेता येतो.

(५) विश्लेषणाचे निष्कर्ष : निरीक्षणे —

वाचकाच्या जाणिवेतील प्रवर्तकता ही परिवर्तनाशी निगडित असल्यामुळे साहित्यकृतीचे सामर्थ्यही या प्रवर्तकतेवरून जोखण्यात येते. आणि 'जननिष्ठ जाणीवप्रवर्तन' हे जनसंस्कृतीच्या जडणघडणीस पोषक ठरत असल्यामुळे त्या साहित्यकृतीची 'जनसाहित्यकृती' म्हणून असलेली श्रेष्ठताही त्यानुसारच ठरविली जाते. अशाप्रकारे (एक) निर्मिती (दोन) संघटना (तीन) प्रतीती व (चार) प्रवर्तकता या सर्व बाबतींत परीक्षणीय साहित्यकृती जननिष्ठ असेल तर तिच्या श्रेष्ठतेच्या मात्रेसह ती 'जनसाहित्यकृती' या गौरवचिन्हांकनास पात्र ठरते.

अशाप्रकारे, जनसाहित्य सिद्धान्ताने दिलेला श्रेष्ठ साहित्याचा मूल्यनिकष ("जननिष्ठा") आणि या मूल्यनिकषाचे निर्वहन करणारी श्रेणीबद्ध विश्लेषणपद्धती यांचा उपयोग करून मराठीतील साहित्यकृतींची समीक्षा करता येते आणि विश्लेषणातून प्राप्त होणाऱ्या सामुग्रीचे वर्गीकरण—व्यवस्थापन—संश्लेषण निकषण या पद्धतीने तोवर अज्ञात असणारी तथ्ये प्रस्थापित करता येतात. अशारीतीने मराठी साहित्यप्रांतातील संशोधनाला सुव्यवस्थित स्वरूप देऊन चिकित्सापूर्ण अभ्यासाच्या बळावर नवी वस्तुनिष्ठ सत्ये प्रकाशात आणता येतात.

(६) जननिष्ठ समीक्षा पद्धती : निष्कर्ष—

वरील संपूर्ण विवेचनाचा सार खालीलप्रमाणे मांडता येईल —

प्रा.या.वा.वडस्कर यांनी घर्ष† मध्ये सुचविलेल्या जनसाहित्याच्या लक्षणविधानातील केन्द्रीय संज्ञांची अर्थनिश्चिती करून नव्या सर्वात्मक अर्थासह घर्ष† ते घर्ष दरम्यान 'एक अभिनव साहित्य सिद्धान्त' या स्वरूपात 'जननिष्ठ साहित्य विचार' विकसित झाला आहे.

जननिष्ठ साहित्य विचार हा तात्त्विक, सर्वात्मक व सुसंबद्ध असल्यामुळे त्याला शास्त्रीय सिद्धान्ताचे स्वरूप लाभले आहे.

जननिष्ठा हा तिहेरी मूल्यनिकष साहित्यनिर्मिती, साहित्यस्वरूप व साहित्याचा आस्वाद या तीन अंगांनी जनसाहित्य विचारात पुरस्कारला गेला असून जनसंस्कृती हे अंतीम लक्ष्य निर्देशिलेले आहे. या अंतीम लक्ष्याकडे नेणारी प्रवर्तकता ही जननिष्ठच असावी अशीही अपेक्षा असून, या प्रवर्तकतेतील जननिष्ठतेच्या प्रमाणावरच त्या त्या कृतीचे श्रेष्ठत्व ठरेल.

या सिद्धान्ताच्या आधारे 'जननिष्ठा' या मूल्यनिकषाच्या अनुरोधाने कोणत्याही साहित्यकृतीची वस्तुनिष्ठ समीक्षा करणे शक्य होते.

'स्त्री' ला संविधानाने तिचे माणूस म्हणून संपूर्ण अधिकार दिलेले आहे परंतु सामाजिक परंपरा, रूढीने तिचे अधिकार नाकारलेले आहे. परंपरेने पुरुषाला स्त्रीपेक्षा श्रेष्ठ मानले आहे. पुरुषाने तिचे व्यक्तीस्वातंर्त्य नाकारलेले आहे. स्त्री दृ पुरुष दोघांनाही संविधानाने समान अधिकार दिले असतांनाही फक्त पुरुषांच्या स्वाथीपोटी स्त्रीला गुलामगिरीमध्ये ठेवण्यात समाज यशस्वी झाला आहे. हि कविता स्त्रीच्या अस्तित्व व अस्मिता करीता आहे. कवितेचा लक्षाबिंदू स्त्री आहे. कवितेचे प्रयोजन आणि हेतू असणेपण आणि असलेपण (अस्तित्व व अस्मिता) आहे स्त्रीवर सामाजिक रूढी आणि परंपरेने गुलामगिरी लादलेली आहे आणि तिची पारतंर्त्यातून सुटका होणे काळाजी गरज आहे. मोहक अदा अपेक्षित देह सौंदर्य हा पुरुषांच्या दृष्टीने अंधार आहे मात्र स्त्रीच्या दृष्टीने पाहिले असता तो स्त्रीच्या

अस्तित्वाला एक प्रकारचा नकारच आहे. कवीच्या मनाच्या नेणीवेत स्त्री आणि पुरुषांच्या सौंदर्याकडे पाहण्याच्या फरकामुळे नेणीवेतून हा अर्थ बाहेर आला आहे. पुरुषांच्या मर्जीनुसार तिने आपली कायां बदलावी म्हणजेच चौत्यन्य त्यागावे पुरुषांच्या मर्जीप्रमाणे तिने पुरुषांची दास बनावे आणि परंपरेला शरण जावे. तिने आई कडील सर्व रूढी परंपरा विसरून पुरुषांकडील परंपरेला शरण जावे पुरुष हा स्त्रीला परंपरेच्या बेड्यत अडकवून तिला स्वातंर्त्याचा भास दाखवून ऊन आणि चटके देतो व ते स्त्रीने मुकाट्यने सहन करावे. पुरुष हा स्वतःला सुर्य समजतो व स्त्रीला धरती समजतो. ज्या प्रमाणे सूर्य आपल्या किरणाने पृथ्वीला ऊन आणि चटके देतो व ती चटके सहन करते तसेच स्त्रीने सुद्धा पुरुषाने अन्याय केला तर तो मुकाट्यने सहन करावा पुरुष हा स्त्रीच्या मातृत्वाचा गौरव करीत असतो आणि समाजही त्याचे समर्थन करीत असतो स्त्रीला रूढी ग्रस्त मूल्यांच्या तराजूत तोलून तिला गुंगीत ठेवतो आणि तिला एकतर तिच्या स्वप्नाचा स्विकार करायला किंवा घर सांभाळायला समाज (पुरुष) भाग भांडत असतो जेव्हा स्त्री एकाचा स्विकार करत असते तेव्हाच तिचे जीवन सायकी लागते म्हणजेच दुधावरची साय बनते.

पहिल्याच कडव्यात जननिष्ठ जाणीव दिसून येते. स्त्री दृ पुरुष समता आहे आक्रोश दिसून येतो. कवीने समर्पक प्रतिमा वापरेल्या आहे. उदा. वस्त्र, झाडाची फांदी, अंधार, सूर्य दृ धरती, माय, दुधावरची साय, लय दृ ही विरुध्द लय, साम्य, सुक्ष्म साम्य, सुक्ष्म विरोध आहे उदा उजेड दृ अंधार, सुर्य दृ धरती, ताप शीतलता समर्पक अशी शैली कवीने वापरल्याचे कवितेमध्ये जानवते .

१) प्रतिमांची बांधणी आणि लयाचा संवाद विरोध बाज यांच्या व्दारे अव्यवत अर्थ हा लयपूर्ण विकासातून प्रकट होतांना जाणवतो त्यामुळे हि स्तवकोंची कविता जननिष्ठ जाणिवेने भांडीत लयपूर्ण रचना ठरते.

२) वाचकांची प्रतीति दृ कवितेतील आशयाची अर्थव्याप्ती समस्त अन्यायग्रस्त स्त्री जातीची बाजू मांडणारी आहे.

खोली दृ स्त्री सृजनाची देवता म्हणून गौरवगीते गात असतानाच तिच्या दावसत्वालाच स्वातंर्त्याचे नाव देणे त्यासाठी ऊनय चटवयाच दाहक वास्तव तिच्या नशिबी भरभरून देणे हि अमानुषता खोलवर भिडते.

गृढता दृ समता विचारापासुन गद्यप्राय ओळी ओकीमधून पहिल्या भागात स्त्रीची बंदिस्तता दुसऱ्या भागात पुरुषाचा दुय्मी जुलमी पणा तिसत्या भागात प्रेम, त्याग, करुणा आणि सर्जकता यांची प्रतिमा असलेली स्त्री चौथ्या भागात स्वप्न आणि घर यातून दुभंगल्या वास्तव यातून एक प्रकारे स्त्रीत्वाच्या स्त्रीच्या दास्यत्वाला समर्पकपणे अधोरेखित करण्यात येते.

'स्त्री' चे स्वप्न आणि घर पैकी केवळ एक निवडण्याची मुभा पुरुष प्रधान संस्कृतीने तिला दिली आहे आणि त्यातून नाईलाजाणे दोनपैकी एक पर्याय निवडून व्याज कृतार्थतेने बनते 'दुधावरची साय' या शब्दात कवितेचा शेवट समर्पकपणे झालेला आहे. एकंदरीत निर्मिती जननिष्ठ, अस्तित्व जननिष्ठ व प्रतीति जननिष्ठ असलेली हि कविता समर्थपने स्त्रीची व्यथा व स्त्री दास्याचे वास्तव्य प्रकट करीत आहे. त्याच बरोबर पुरुष प्रधान विचारसरणीला सौम्य का असेना पण आव्हान मात्र देत आहे.

संदर्भ—

१) अक्षरवैदर्भी रजत जयंती वर्ष (फ्रेब्रुवारी २००९)
२) प्रश्नंची मातृभाषा दृ युवराज सोनटक्के, स्मिता पब्लिकेशन, गुहागर जि. रत्नागिरी
३) सौंदर्य आणि साहित्य ('वाङ्मयीन महात्मता') बा.सी.मर्ढेकर, मौज प्रकाशन, मुंबई, पृ. १६८—१६९.
४) 'जनसाहित्याच्या दिशेने' — या. वा. वडस्कर, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, डिसें. १९८८
५) अक्षरवैदर्भी: साहित्यसंमेलन विशेषांक, ऑ. नो. डि. २००२ पृ.४७ व ४८.
६)अक्षरवैदर्भी : दिवाळी विशेषांक, ऑ.नो.डि. २००७, पृ.३०.



मराठी विभाग प्रमुख
बाळासाहेब राणा महाविद्यालय,
कनेरा